**प्रशासकीय मान्यता आदेश**

जा.क्र.नियोजन/प्रमा/का-२/डोंविविका/०९-१०/३९९
जिल्हा नियोजन समिती,
जिल्हाधिकारी कार्यालय,हिंगोली
**दिनांकः-२५/०३/२०१०**

**विषय** :- डोंगरी विभाग विकास कार्यक्रम-२००९-२०१०
प्रशासकीय मान्यता आदेश

**संदर्भ** :- १) शासन निर्णय नियोजन विभाग क्रं.डोंविका-२००९/प्र.क्र.६/का-१४८३/दिनांकः १८ जानेवारी २०१०
२) शासन निर्णय नियोजन विभाग क्रं बीजीटी-२००९/प्र.क्र.-२८/का-१४८३दि.२०.६.२००९
३) शासन निर्णय नियोजन विभाग क्रं बीजीटी-२००९/प्र.क्र.-२८/का-१४८३दि.१७.११.२००९
४) शासन निर्णय नियोजन विभाग क्रं बीजीटी २००९/प्र.क्र. २८/का-१४८३दि.२९.१२.२००९

शासन निर्णय नियोजन विभाग क्रं.डोंविका-२००९/प्र.क्र.६/का-१४८३/दिनांकः १८ जानेवारी २०१० अन्वये जिल्हाधिकारी यांना प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन मी जिल्हाधिकारी, हिंगोली या आदेशान्वये खालील तक्त्यात वर्णन केलेल्या कामास **खालील अटीवर प्रशासकीय मंजूरी देत आहे.**

१. यंत्रणेने सदरचे काम खात्यामार्फत करावयाचे आहे./ग्रामपंचायत मार्फत करावयाचे आहे.
२. यंत्रणेने या कामाच्या खर्चाचा हिशेब रो.ह.यो.लेखा कार्यपध्दतीप्रमाणे स्वतंत्र ठेवावेत.
३. कार्यकारी यंत्रणेने कामांस प्रशासकीय मंजूरी दिलेल्या रकमेत काम करावे, मंजूरीपेक्षा जास्त खर्च करु नये. अंदाजपत्राकापेक्षा जादा खर्च केल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी यंत्रणेची राहील.सदरचे कामांना वितरीत होणारे अनुदान चालू वित्तीय वर्ष संपण्यापूर्वी पूर्ण खर्च होईल असे पहावे.
४. अंदाजपत्रकातील कामाच्या वर्णनाप्रमाणे काम दर्जेदार करण्याची जबाबदारी यंत्रणेची राहील.
५. जिल्हाधिकारी यांचेकडे या संबंधी दर महिना अखेर कामाचा प्रगती अहवाल महिन्याचे ५ तारखे पर्यंत पाठवावा.
६. मंजूर काम शासकीय/ग्रामपंचायत/नगरपालिका मालकीच्या जागेवर करावे.जागा उपलब्ध असल्याचे प्रमाणपत्र प्राप्त करुन घ्यावे.खाजगी संस्था/ सरकारी संस्था/ट्रस्ट यांची कामे घेता येणार नाहीत.
७. कामांचा प्रस्ताव तयार करतांना कामाचे समर्थन, जिल्हास्तरीय कामासाठी जिल्हा नियोजन समितीची मान्यता, शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या परिपत्रकातील सूचनांचे अनुपालन झालेले असावे. नसल्यास तांत्रिक मंजूरी देण्यापूर्वी या सर्व बाबींची पुन्हा खातरजमा करुन घेण्यांत यावी.
८. मंजूर केलेले काम पूर्ण झाल्यानंतर हे संबंधीत यंत्रणेकडे पुढील देखभालीसाठी हस्तांतरीत करावे व पूर्णत्वाचा व हस्तांतरणाचा दाखला जिल्हाधिकारी यांना सादर करावा. देखभाल व दुरुस्तीसाठी काम ताब्यात घेणार असल्याचे हमीपत्र अगोदरच संबंधितांकडून प्राप्त करुन घेतले नसल्यास ते प्राप्त केल्याशिवाय काम सुरु करु नये.
९. सदरचे काम कार्यवाही यंत्रणे मार्फत आणि जिल्हयातील ईतर यंत्रणे मार्फत अन्य योजनेतुन झालेले नाही अथवा सुरु नाही किंवा मंजूर नाही याची यंत्रणेनी पूर्ण खात्री करुन घ्यावी. तसे प्रमाणपत्र सादर करावे.
१०. या निधीतुन जी बांधकामे हाती घेण्यात येतील. ती शासकीय/स्थानिक स्वराज्य संस्थेच्या जागेवर घेण्यात यावे व त्यावर संबंधीत शासन यंत्रणेची मालकी राहील.
११. <u>या कामावर होणारा खर्च खालील लेखाशिर्षातून करावा.</u>

**मागणी क्रमांक ओ-१०,**
**४५५१-डोंगराळ क्षेत्रावरील भाडंवली खर्च -राज्य योजनांतर्गत योजना-६०.**
**इतर डोंगराळ क्षेत्रे (००)(०१),**
**डोंगराळ क्षेत्राकरीता विशेष विकास कार्यक्रम**
**(४५५१ ००११) (योजनांतर्गत)**

१२. सदरील कामांना सक्षम अधिका-यांनी तांत्रिक मान्यता प्रदान केलेली आहे. असे ग्राहय धरुन प्रशासकिय मान्यता प्रदान करण्यांत येत आहे.
१३. मंजूर केलेल्या बांधकामाचे आकारमान हे प्रशासकिय मंजूरी दिलेल्या नकाशे व अंदाजपत्रकानुसारच कार्यान्वीत करण्यांत यावी. **तसेच प्रशासकीय मान्यता दिलेल्या कामाचे तुकडे पाडुन काम करता येणार नाही व त्यामध्ये फेरबदल करता येणार नाही.**
१४. शासनाच्या मार्गदर्शक सूचनानुसार सदरील काम एक ते दोन वर्कीग सिझनमध्ये पूर्ण करणे बंधनकारक राहील.
१५. या कामाचे निरिक्षण व तपासणीचे काम संबंधित स्वतः कार्यकारी अभियंता यांचेकडून आणि जिल्हाधिकारी यांनी नियुक्त केलेल्या अधिका-याकडून अथवा नियोजन विभाग महाराष्ट्र शासन अथवा सार्वजनिक बांधकाम खात्यानी नेमून दिलेल्या अधिका-यांकडून होऊ शकेल.
१६. प्राथमिक शाळेच्या खोल्याचे बांधकाम शासनांनी विहीत केलेल्या टाईप डिझाईन नुसारच करावयाचे असून विहित आर्थिक मर्यादेतच खर्च करावयाचा आहे.
१७. शासनाच्या मार्गदर्शक सूचनानुसार सदरचे काम पूर्ण होताच कामाच्या दर्शनी भागावर आमदारांचा स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत घेण्यांत आलेल्या कामाचे नाव,वर्ष व खर्च लिहावा.

उपरोक्त अटीची पूर्तता करुन घेणे कार्यान्वयीन यंत्रणेवर बंधनकारक आहे.सन २००९-२०१० साठी डोंगरी विभाग विकास कार्यक्रमांतर्गत उपलब्ध झालेल्या निधीतून खालील रुपये १.०० लाखाच्या एका कामांना प्रशासकीय मान्यता देण्यांत येत आहे.

## डोंगरी विभाग विकास कार्यक्रम २००९-१०

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजपत्रकीय किंमत (रु.लाखात) | प्रशासकीय मान्यता किंमत (रु.लाखात) | कार्यान्वयीन यंत्रणेचे नांव |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| | उपगट-हिंगोली | | | |
| १ | मौ. खंडाळा ता.जि.हिंगोली येथे दोन शाळा खोली दुरुस्ती करणे | १.०० | १.०० | कार्यकारी अभियंता सां.बां.वि.हिंगोली |
| | एकूण - | १.०० | १.०० | |

(अक्षरी रुपये एक लक्ष फक्त)

स्थळप्रतिवर मा.जिल्हाधिकारी यांची स्वाक्षरी असे

जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव,
जिल्हा नियोजन समिती,हिंगोली करिता

**टिप**:- १) वर नमूद केलेल्या कामास देण्यात आलेली प्रशासकीय मान्यता मागील पृष्ठावरील अनुक्रमांक १ ते १७ या अटीच्या अधिन राहून दिलेली आहे या अटीपैकी ज्या ठिकाणी विशिष्ट कागदपत्राची पूर्तता करुन घेणे आवश्यक आहे. त्या कागदपत्राची/परवानगीची पूर्तता करुन घेऊनच प्रत्यक्ष कामे सुरु करण्यांत यावीत **या अटीवरच मंजूरी देण्यात येत आहे.**

**प्रत** :- १) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,हिंगोली यांना माहितीस्तव व पुढील योग्य त्या कार्यवाहीस्तव
२) जिल्हा सुचना व विज्ञान अधिकारी,हिंगोली यांना माहितीस्तव व पुढील योग्य त्या कार्यवाहीस्तव
३) मा.आ.श्री.भाऊराव पाटील गोरेगावकर,विधान सभा सदस्य हिंगोली यांना माहितीस्तव
४) शिक्षणाधिकारी (प्रा.)जि.प.हिंगोली यांना माहीती व योग्य त्या कार्यवाहीस्तव.

स्थळप्रतिवर मा.जिल्हाधिकारी यांची स्वाक्षरी असे

जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव,
जिल्हा नियोजन समिती,हिंगोली करिता

## डोंगरी विभाग विकास कार्यक्रम सन 2009-10

### परिशिष्ट - अ

जिल्हा हिंगोली. (रुपये लाखात)

| अ. क्र. | कामाचे नांव | वर्ष | प्रशासकीय मान्यता किमत | या पुर्वी वितरण | या आदेशान्वये वितरण | एकुण वितरण | कार्यान्वयीन यंत्रणेचे नांव |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| | **अ) उपगट कळमनुरी** | | | | | | |
| 1 | मौ.चिंचोली ता.हिंगोली येथील शाळा खोली दुरुस्ती करणे | 2009-10 | 1.00 | 0.00 | 0.50 | 0.50 | अभियंता सा.बा. विभाग हिंगोली. |
| 2 | मौ.पेडगाव ता.हिंगोली येथील शाळा खोली दुरुस्ती करणे | 2009-10 | 1.00 | 0.00 | 0.50 | 0.50 | --"--- |
| 3 | मौ.फुटाणा ता.कळमनुरी येथील शाळा खोली दुरुस्ती करणे | 2009-10 | 1.26 | 0.00 | 0.63 | 0.63 | --"--- |
| 4 | मौ.चुंचा ता.कळमनुरी येथील शाळा खोली दुरुस्ती करणे | 2009-10 | 1.27 | 0.00 | 0.64 | 0.64 | |
| 5 | मौ.सिंदगी ता.कळमनुरी येथील शाळा खोली दुरुस्ती करणे | 2009-10 | 2.00 | 0.00 | 1.00 | 1.00 | --"--- |
| 6 | मौ.कान्हेगाव ता.कळमनुरी येथील शाळा खोली दुरुस्ती करणे | 2009-10 | 1.00 | 0.00 | 0.50 | 0.50 | --"--- |
| 7 | मौ.जांब ता.कळमनुरी येथील शाळा खोली दुरुस्ती करणे | 2009-10 | 1.00 | 0.00 | 0.50 | 0.50 | --"--- |
| 8 | मौ.दांडेगाव ता.कळमनुरी येथील शाळा खोली दुरुस्ती करणे | 2009-10 | 2.00 | 0.00 | 1.00 | 1.00 | --"--- |
| 9 | मौ.चिंचोली ता.हिंगोली येथे नविन रस्ता खडीकरण करणे | 2009-10 | 2.80 | 0.00 | 1.40 | 1.40 | --"--- |
| 10 | मौ.सालेगाव ता.कळमनुरी येथे नविन पुलाचे बांधकाम करणे | 2009-10 | 2.91 | 0.00 | 1.41 | 1.41 | --"--- |
| | **एकुण अ** | | **16.24** | **0.00** | **8.08** | **8.08** | |
| | **ब) उपगट हिंगोली** | | | | | | |
| 1 | मौ.गोरेगाव ता.सेनगाव ते गोटेवाडी जोडरस्त्याचे बांधकाम करणे | 2009-10 | 9.92 | 0.00 | 4.92 | 4.92 | कार्यकारी अभियंता सा.बा.वि.हिंगोली |
| 2 | मौ.नर्सी (ना.) ता.जि.हिंगोली येथे ग्रा.प.हद्दीत नामदेव मंदीराजवळ सिमेंट रस्त्याचे बांधकाम करणे | 2009-10 | 3.30 | 0.00 | 2.00 | 2.00 | --"--- |
| 3 | मौ.नर्सी (ना.) ता.जि.हिंगोली येथे नविन शाळा खोली बांधकाम करणे | 2009-10 | 2.96 | 0.00 | 1.46 | 1.46 | --"--- |
| 4 | मौ.पळशी ता.सेनगाव जि.हिंगोली येथे दोन शाळा खोली दुरुस्ती करणे | 2009-10 | 1.00 | 0.00 | 0.50 | 0.50 | --"--- |
| 5 | नर्सी ना. येथे दोन जि.प.शाळा खोली दुरुस्ती करणे. | 2009-10 | 0.96 | 0.62 | 0.34 | 0.96 | |
| | **एकुण ब** | | **18.14** | **0.62** | **9.22** | **9.84** | |
| | **एकुण (अ + ब)** | | **34.38** | **0.62** | **17.30** | **17.92** | |

**जिल्हाधिकारी व सदस्य सचिव,**
**जिल्हानियोजन समिती, हिंगोली**

क्र.नियोजन/डोंविका/आरए-2/2009-10/398
जिल्हा नियोजन समिती,
जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली
दिनांक:-25/3/10

## निधी वितरण आदेश

**विषय :- डोंगरी विभाग विकास कार्यक्रम - 2009-10**
**निधी वितरण करणे बाबत.**

संदर्भ : 1) ग्रामविकास विभाग शासन निर्णय क्र.झेडपीए-1090/सीआर-1654/24/दि.07.01.1992
2) नियोजन विभाग शासन निर्णय क्र.स्थाविका-1092/जिपनिअ/सिआर-21/योजना-6दि.16.03.1992
3) नियोजन विभाग पत्र क्र.बीजीटी-2009/प्र.क्र.28/का-1483 दिनांक 18 जुलै 2009
4) नियोजन विभाग पत्र क्र.बीजीटी-2009/प्र.क्र.28/का-1483 दिनांक 17 नोव्हेंबर 2009
5) संगणक वितरण प्रणाली (BDS) द्वारे प्राप्त निधी

उपरोक्त विषयी संदर्भीय शासन निर्णयाव्दारे डोंगरी विभाग विकास कार्यक्रम सन 2009-2010 करीता हिंगोली जिल्ह्यातील हिंगोली उपगट रु.30.00 लक्ष व कळमनुरी उपगटासाठी रु.30.00 लक्ष असे **एकुण प्राप्त निधी रुपये 60.00 लक्ष आहे**.या प्राप्त निधीमधून खालील यंत्रणांना त्यांचे कडील सोबतच्या परिशिष्टामध्ये नमूद केलेली प्रशासकीय मंजूरी दिलेले काम पुर्ण करण्यासाठी / पूर्ण झाल्यामुळे त्यांचे नांवासमोर दर्शविल्याप्रमाणे निधीचे वितरण करण्यात येत आहे.

(रुपये लाखात)

| अ.क्रं | कार्यकारी यंत्रणा | उपगटाचे नाव | या आदेशापूर्वीचे वितरीत निधी | या आदेशा व्दारे वितरीत निधी | एकूण वितरीत निधी स्तंभ (4+5) |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| 1 | का.अ.सा.बा.वि.हिंगोली | हिंगोली | 13.76 | 9.22 | 22.98 |
| | | कळमनुरी | 16.73 | 8.08 | 24.81 |
| | **एकूण :-** | | **30.49** | **17.30** | **47.79** |

**(अक्षरी रुपये सतरा लक्ष तीस हजार फक्त )**

या आदेशान्वये **रुपये 17.30 लक्ष (अक्षरी रुपये सतरा लक्ष तीस हजार फक्त )** वितरीत केल्यानंतर,जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव,जिल्हा नियोजन समिती, हिंगोली यांचेकडे **हिंगोली उपगटासाठी रुपये 7.02 लक्ष व कळमनुरी उपगटासाठी रुपये 5.19 लक्ष असे हिंगोली जिल्हाकरिता एकुण रुपये 12.21 लक्ष** निधी शिल्लक राहील.कार्यन्वयीन यंत्रणेना वितरीत करण्यात येत असलेला निधी खालील अटीच्या अधिन राहुन खर्च करण्यात यावा.

1) ज्या कामासाठी निधी मंजुर करण्यात आलेला आहे त्याच कामावर खर्च करण्यात यावा तसेच प्रशासकिय मंजुरी पैक्षा जास्तीचा निधी दिला जाणार नाही.
2) या कार्यक्रमातर्गत प्रशासकीय मान्यता दिलेल्या किमंतीला अधिन राहुनच निधी वितरीत करण्यात आलेला आहे.वर्ष अखेरपर्यंत 100% निधी खर्च करण्यात यावा व प्र.मा.दिलेल्या किमंतीपेक्षा जास्तीचा खर्च करण्यात येवु नये.
3) सदरचा निधी डोंगरी विभाग विकास कार्यक्रमांतर्गत प्रशासकीय मंजूरी दिलेल्या कामावरच खर्च करावा.
4) वितरीत तरतूद व्यपगत होणार नाही.तसेच अखर्चित राहणार नाही याची दक्षता घ्यावी व सदरील अनुदान कोषागाराव्दारे काढल्याचे कोषागार प्रमाणक क्रमांक व दिनांक या कार्यालयास विनाविलंब पाठवावे.
5) निधी विनियोग केले बाबतचा दाखला मुदतीत निधी खर्च करुन पाठवावा.
6) या कार्यक्रमांतर्गत होणारा खर्च महाराष्ट्र अर्थ संकल्प नियम पुस्तीका खंड I परि.155(4) मध्ये दर्शाविले प्रमाणे ठेवावा.आणि एकत्रीत खर्चाचा त्रैमासिक ताळमेळ अहवाल महालेखाकार (लेखा व अनुज्ञेयता)महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचेकडील लेख्याशी ताळमेळ घालून विवरणपत्र त्वरीत या कार्यालयास पाठवावे.
7) **पूर्ण झालेल्या कामांचे पूर्णत्वाचे प्रमाणपत्र व काम हस्तांतरीत केले बाबतचे प्रमाणपत्र,उपयोगीता प्रमाणपत्र व कामाच्या नामफलकासह फोटो या कार्यालयास त्वरीत पाठवावे.**

**उपरोक्त वितरीत केलेला निधी खालील लेखा शिर्षाखाली खर्ची टाकावा.**
**मागणी क्र: "ओ-10, 4551-डोंगराळ क्षेत्रावरील भांडवली खर्च**
**राज्य योजनांतर्गत योजना-60 इतर डोंगरी क्षेत्र (00) (01),**
**डोंगराळ क्षेत्राकरीता विशेष विकास कार्यक्रम**
**(4551 0011) (योजनांतर्गत)"**

जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव,
जिल्हा नियोजन समिती, हिंगोली

प्रतिलिपी :-
1) जिल्हा कोषागार अधिकारी, हिंगोली
2) कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग,हिंगोली
3) उपलेखापाल,जिल्हा नियोजन समीती हिंगोलीयांना या आदेशाची प्रत देऊन कळविण्यात येते की वरील प्रमाणे वितरीत निधी संबधीत यंत्रणेस संगणक वितरण प्रणाली (बी.डी.एस) वर तात्काळ उपलब्ध करून देण्यात यावा
4) जिल्हा सुचना व विज्ञान अधिकारी,हिंगोली यांना माहितीस्तव व पुढील योग्य त्या कार्यवाहीस्तव

जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव,
जिल्हा नियोजन समिती, हिंगोली